REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

वाळूज एम.आय.डी.सी. मधील अस्थायी कामगारांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन

डॉ.पी.व्ही.देशमुख
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

प्रस्तावना :

औद्योगिक विकासाशिवाय आर्थिक विकास शक्य नाही हे विकसीत राष्ट्रांनी सिध्द करुन दाखविले म्हणुन प्रत्येक राष्ट्र औद्योगिक विकासावर लक्ष केंद्रीत करताना दिसते. केवळ औद्योगिकच नव्हे तर मूल्यनिर्मित महत्वाची भूमिका असलेला कामगार वर्ग विकासाच्या प्रवाहात असणे आवश्यक असते. मराठवाड्यासारख्या मागासलेल्या प्रदेशातील औद्योगिकरणात अनेक अडथळे दिसतात. औरंगाबाद हे मराठवाड्यातील राजधानीचे शहर असल्याने रोजगारासाठी अनेक कामगार औरंगाबाद व औद्योगिक परिसरात येतात. शेंद्रा एम.आय.डी.सी., वाळूज एम.आय.डी.सी. या औद्योगिक वसाहतीत अनेक औद्योगिक उत्पादन संस्था कार्यरत दिसतात. सरकारही या औद्योगिक वसाहतीच्या विकासासाठी वेगवेगळे उपाय करते

एका बाजुला या औद्योगिक वसाहतींचा विस्तार होताना दुसऱ्या बाजुला मात्र औद्योगिक कामगारांच्या समस्याही वाढतना दिसतात. मंदी, अल्पवेतन, अस्थाई रोजगार, गरिबी, अशा आर्थिक समस्यांचा सामना या कामगारांना सतत करावा लागतो. या धर्तीवर वाळूज औद्योगिक वसाहतीत अस्थायी कामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे आवश्यक होते. कारण या कामगारांच्या आर्थिक, कौटूंबीक, सामाजिक, समस्या तीव्र असल्याने विविध प्रसिध्दी माध्यमांद्वारे दिसुन येते. या धर्तीवर वाळूज औद्योगिक वसाहतीत अस्थायी कामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे आवश्यक होते. कारण या कामगारांच्या आर्थिक, कौटुंबीक, सामाजिक समस्या तीव्र असल्याचे विविध प्रसिध्दी माध्यमांद्वारे दिसुन येते. या धर्तीवर सहेतूक निवड पध्दतीने २०० अस्थायी कामगारांची निवड करुन त्यांच्या आर्थिक समस्यांचे विविध पैलू अभ्यासून त्यानुषंगाने काही महत्वपूर्ण शिफारशी प्रस्तुत शोध-प्रबंधात केलेल्या आहेत.

१.औरंगाबाद जिल्ह्यातील मानवी विकास :

लोकांना मिळणाऱ्या संधीचा परिघ मोठा करण्याची, **विस्तारत** नेण्याची प्रक्रिया म्हणजे मानवी विकास होय. औरंगाबाद जिल्ह्याचा मानवी विकास २००२ च्या मानव विकास अहवालानूसार ०.६५० इतका होता. २०१२ च्या अहवालानूसार ०.०७७ एवढी वाढ होऊन ०.७२७ एवढा झाला असल्याचे दिसून येते.

एकंदरीत औरंगाबाद हा जिल्हा मराठवाड्यातील वैशिष्टयपूर्ण जिल्हा असून औरंगाबाद जिल्ह्याची वाटचाल विकासा**च्या** दिसेने होत असल्याचे स्पष्ट होते.

तक्ता क्र.१:औरंगाबाद शहरातील औद्योगिक क्षेत्राची स्थिती (२०१२)

अ. क्र.	औद्योगिक क्षेत्राचे नाव	क्षेत्र हेक्टर	प्लॉटची संख्या	वितरीत प्लॉटची संख्या	प्लॉटची किंमत	रिकाम्या प्लॉटची संख्या
१	वाळूज एम.आय.डी.सी.	१५२१.९९	३२५५	३२४९	१५७५	०६
२	रेल्वे स्टेशन एम.आय.डी.सी.	३४.९५	८७	८३	१३९५	०४
३	चिखलठाणा एम.आय.डी.सी.	७१९.६८	९५५	८५३	१६००	१०२

४	शेंद्रा एम.आय.डी.सी.	९०२.८८	४५३	३९२	५००	६१
	एकून	३१७९.५	४७५०	४५७७	५०७०	१७३६१

स्त्रोतः Government of India ministry MSME Brief Industrial profile of Aurangabad District

२ वाळूज एम.आय.डी.सी. :

महाराष्ट्राला 'देशाचे ग्रोथ इंजिन' करण्यासाठी मुंबई-नाशिक-पुणे-औरंगाबाद हा औद्योगिक पट्टा महत्वाची भुमीका बजावत आहे. या औद्योगिक पट्यातील औरंगाबाद औद्योगिक क्षेत्रात शेंद्रा एम.आय.डी.सी, चिखलठाणा एम.आय.डी.सी, रल्वे स्टेशन एम.आय.डी.सी, व वाळूज एम.आय.डी.सी. हे औद्योगिक समूह विकासीत करण्यात आलेले आहेत. वाळूज एम.आय.डी.सी. ला औरंगाबादच्या औद्योगिक विकासात अनन्यसाधारन महत्व आहे. वाळूज एम.आय.डी.सी. औरंगाबाद-अहमदनगर-पुणे या महामार्गावर औरंगाबाद शहरापासून १२.०० कि. मी. अंतरावर १९७०-१९८० या दशकात स्थापन करण्यात आली. वाळूज एम.आय.डी.सी. ही औद्योगिक वसाहत १५६३ हेक्टर क्षेत्रावर विस्तारलेली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा अंतर्गत वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीत पयाभूत सोईसुविधा पुरवण्यात आल्यामुळे वाळूज एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीकडे भारतातील महत्वपूर्ण कंपन्या आणि नवनवीन उद्योजकांचे आकर्षन वाढत आहे. त्यामुळे वाळूज एम.आय.डी.सी. मध्ये नवनवीन कंपन्यांच्या संख्येत वाढ होत आसल्याचे दिसून येते.

वाळून एम.आय.डी.सी. औद्योगिक समूहात प्रामुख्याने शेतीवर आधारीत उद्योग, ॲटोमोबाईल उद्योग, अभियांत्रिकी उद्योग, औषधी उद्योग, इलेक्ट्रॉनिक उद्योग, इत्यादी उद्योगाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते. वाळूज एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीत शेतीवर आधारीत १२७७ उद्योग आहेत. ऑटोमोबाईल व अभियांत्रीकी स्वरूपाचे ७७४ युनिट आहेत. औषधी निर्मीती उद्योगाचे ५६ युनिट आहेत. त्याचबरोबर इलेक्ट्रॉनिक वस्तू बनवणारे ३५ उद्योग आहेत. हे सत्य असले तरी वाळूज एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीतील जवळपास २० टक्के उद्योग बंदपडण्याच्या स्थितीत असल्याचे वास्तव नाकारून चालनार नाही.या उद्योगांना चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे.

वाळूज एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीत बजाज ॲटो, कोलगेट, पामोलव, सी.ई.ए.टी. टायर, विपरो, किंगस्टार, गरवारे, वखाड, फोस्टर, स्टरलाईट, बिडवे मोटार्स, जॉन्सन ॲन्ड जॉन्सन, या सारख्या अनेक कंपन्या सुरू आहेत. या कंपन्यात कामकरणारे कामगार हे कायम व हंगामी स्वरूपाचे आहेत. या औद्योगिक वसाहातीत कामासाठी येणारे बहूसंख्य कामगार प्रामुख्याने मराठवाडा, विदर्भ, खानदेश या विभागातील विविध जिल्ह्यातून येत असल्याचे दिसून येते. वाळूज एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीत कामकरणारे कामगार औरंगाबाद शहराच्या विविध भागातून वाळूज एम.आय.डी.सी. परिसरातील वाळूज महानगरात वास्तव्य करत आल्याचे दिसून येते.

३. वाळूज एम.आय.डी.सी. मधील आर्थिक स्थिती :

वाळूज एम.आय.डी.सी मधील अस्थयी कामगारांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे वास्तव वाळूज एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीतून सहेतूक नमूना निवड पध्दतीच्या सहाय्याने नमूना निवडलेल्या २०० कामगारांच्या मुलाखत, अनुसूची व निरिक्षणाच्या आधारे करण्यात आलेले आहे. ते खालील प्रमाणे आहे.

४.जोडधंद्याची स्थिती :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची जोडधांद्यांची स्थिती तक्ता क्र.२ दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र..२ः कामगारांच्या जोड व्यवसायाची स्थिती

अ. क्र.	जोडधंदा	एकूण	शेकडा प्रमाण
१	होय	१९	९.५
२	नाही	१८१	८२.५
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी

वाळूज औद्योगिक वसाहतीत काम करणाऱ्यां कामगारांच्या जोडधंद्याचा विचार केला असता फारशी समाधनकारक स्थिती नाही. कारण २०० कामगारांपैकी केवळ १९ म्हणजे ९.५ टक्के कामगारांकडे जोडधंदा आढळून आला. वास्तविक पाहता या कामगारांना स्वंयमरोजगाराच्या संधी शोधने आवश्यक असते.

५ घराची स्थिती :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची घर विषयक स्थिती तक्ता क्र.३ दर्शवण्यात आलेली आहे

तक्ता क्र.३:अ) कामगारांच्या घरांच्या मालकीची स्थिती

अ. क्र.	घराची मालकी	एकूण	शेकडा प्रमाण
१	स्वतः चे	३५	१७.५
२	भाड्याचे	१६५	८२.५
	एकूण	२००	१००

ब) घराचा प्रकार :

अ. क्र.	घराचा प्रकार	एकूण	शेकडा प्रमाण
१	कच्चे	१९	९.५
२	अर्ध पक्के	८९	४४.५
३	पक्के	९२	४६.०
	एकूण	२००	१००

क) कामगारांच्या राहत्या घरातील खोल्यांची स्थिती

अ. क्र.	खोल्यांची संख्या	एकूण	शेकडा प्रमाण
१	एक	१०५	५२.५
२	दोन	७५	३७.५
३	तीन	१०	०.५
४	चार	०९	०४.५
५	इतर	०१	०.५
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

कामगारांच्या निवाऱ्यांची स्थिती पाहणे आवश्यक असल्याने घर मालकीच्या दृष्टीकोनातुन सत्य जाणून घेतले असता. केवळ ३५ म्हणजे १७.५ टक्के कामगारांकडे स्वतः चे घर होते. तर ८२.५ टक्के कामगार दुसऱ्याच्या घरात भाडे तत्वावर राहत होते. घरांच्या वाढत्या किंमती आणि अल्पवेतणाच्या पार्वभूमीवर स्वतःच्या मालकीच्या घरांचा अभाव असल्याचे दिसते. शहरीकरणाचा अणुकुल परिणाम घरांच्या दर्जावर दिसून आला. कारण ४६ टक्के कामगार पक्या घरात राहत होते. तर ४४ टक्के लोक अर्ध पक्या घरात राहत होते. तर कच्या घराचे प्रमाण ६.५ टक्के होते. त्यामुळे भाडेतत्वावर का असेना परंतु सुरक्षीत घरांची गरज पूर्ण झाल्याची दिसून आली. तर एका खोलीत राहणाऱ्या कुटुंबाची संख्या १०५ म्हणजेच ५२.५ टक्के होते. तर दोन खोल्यात असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ३७ टक्के होते.

६. स्वतंत्र स्वयंपाक घराची स्थिती :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची स्वतंत्र स्वयंपाक घराची स्थिती तक्ता क्र.४ दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.४ :कामगारांच्या स्वंयपाक घराची स्थिती

अ. क्र.	स्वयंपाक घर	एकूण	शेकडा प्रमाण
१	होय	६८	३४
२	नाही	१३२	६६
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

स्वयंपाक घराचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, ६८ टक्के कामारांकडे स्वतंत्र स्वयंपाक घर होते. तर ६६ टक्के कामगारांकडे स्वतंत्र स्वयंपाक गृहाचा अभाव होता. स्वतंत्र स्वयंपाक गृह नसल्याने रहात्याघरात स्वयंपाक करावा लागतो परिणामी कामगारांच्या मुलांच्या जीवनावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसून आले.

७. स्वयंपाकासाठीचे इंधन :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची इंधन विषयक स्थिती तक्ता क्र.५दर्शवण्यात आलेली आहे

तक्ता क्र.५:कामगारांना स्वंयपाक करण्यासाठी लागणाऱ्या इंधनाची स्थिती

अ. क्र.	स्वयंपाक कशावर करता	एकूण	शेकडा प्रमाण
१	चूल	११	५.५
२	स्टोव्ह	६७	३३.५
३	गॅस	११४	५७
४	शेगडी	०८	४
५	इतर	००	००
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

स्वंयाकाच्या माध्यमाचा विचार करणे क्रमप्राप्त होते. म्हणून स्वयंपाक कशावर केल्या जातो. याची माहिती संकलित केल्यास आजूनही ३३.५ टक्के कामगार स्टोव्ह (केरोसीन) चा वापर करीत होते. चूल व त्यासाठी जळावू लाकडाचा वापर ५.५ टक्के कामगार करीत होते. गॅस वापरणाऱ्यांचे प्रमाण ५७ टक्के होते. मात्र दुर्देवाने सौरउर्जाचा किंवा पवन उर्जेचा वापर स्वंयपाकासाठी होताना दिसून आला नाही.

८.वीजविषयक स्थिती :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची वीज विषयक स्थिती तक्ता क्र.६दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.६:कामगारांची वीज विषयक स्थिती

अ. क्र.	वीज	एकूण	शेकडा प्रमाण
१	होय	२००	१००
२	नाही	००	००
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

वाळूज औद्योगिक वसाहत औरंगाबाद शहराजवळ असल्याने आणि औद्योगिक क्षेत्राला असलेली विजेची गरज लक्षात घेता २०० म्हणजेच सर्वेक्षणासाठी निवडलेल्या सर्वच कामगार वीजेचा वापर करीत होते. असे असले तरी विजेच्या वाढत्या वापराच्या स्थितीबद्दल अनेक कामगारांनी चिंता व्यक्त केली.

९. घरात उपलब्ध असलेल्या अन्य सुविधा :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची अन्य सुविधा विषयक स्थिती तक्ता क्र.७ दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.७:कामगारांच्या घरात उपलब्ध असलेल्या अन्य सुविधा

अ. क्र.	सुविधा	एकूण	शेकडा प्रमाण
१	टेबल	७४	३७
२	खुर्ची	८७	४३.५
३	कपाट	७१	३५.५
४	टी.व्ही	१०३	५१.५
५	भ्रमणध्वनी	१९६	९८
६	सिलिंग फॅन	१५५	७७.५
७	टेबल फॅन	३३	१६.५
८	कुलर/फ्रिज	२७	१३.५
९	रेडियो	१६	८
१०	कॉम्यूटर	११	५.५
११	सायकल	६५	३२.५
१२	मोटारसायकल	७०	३५
१३	कार	३	१.५

१४	इतर	८	४

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

कामगारांच्या घरात उपलब्ध असलेल्या अन्य सुविधा

कामगाराच्या राहणीमानाचा दर्जा हा त्याच्या वापरातल्या वस्तुवर अवलंबुन असतो. म्हणून कामगारांच्या कुटुंबातील वस्तुंचे विवरण अभ्यासण्यात आले. टेबल, खुर्ची, कपाट, टी.व्ही, सिलिंग फॅन, टेबलफॅन, कपाट, फ्रिज, कॅम्प्यूटर, सायकल, मोटारसायकल, कार, भ्रमणध्वनी अशा विविध वस्तुच्या वापरात भ्रमनध्वनी वापरणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ९८ टक्के होते. तर सिलिंग फॅन वापरणाऱ्यांचे प्रमाण ७७.५ टक्के होते. खुर्ची वापरणाऱ्यांचे प्रमाण ४३.५ टक्के तर टेबर वापरणाऱ्यांचे ३७ टक्के होते. स्वतः ची कार असणाऱ्या कामगारांचे प्रमाण १.५ म्हणजे नगण्य होते. मोटारसायकल वापरणाऱ्यांचे प्रमाण ३५ टक्के तर सायकन वापरणाऱ्यांचे प्रमाण ३२.५ टक्के म्हणजेच मोटारसायकल वापरणाऱ्यांच्या प्रमाणापेक्षा सायकल वापरणाऱ्यांचे प्रमाण कमी होते.

१० आरोग्यविषयक स्थिती :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची आरोग्य विषयक स्थिती तक्ता क्र.८ दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.८: आरोग्यविषयक त्रासाची स्थिती

अ. क्र.	आरोग्य विषयक त्रास	एकूण	शेकडा प्रमाण
१	होय	७७	३८.५
२	नाही	१२३	६१.५
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

११.आजारी असल्यास सुट्टी मिळते काय :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची आजारी असल्यास सुट्टी विषयक स्थिती तक्ता क्र.९ दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.९:अ) आजार पणातीत मिळत असलेली सुट्टीची माहिती

अ. क्र.	सुट्टी मिळते काय?	एकून	शेकडा प्रमाण
१	होय	१०९	५४.५
२	नाही	९१	४५.५
	एकूण	२००	१००

ब) आरोग्य विषयक सुविधांची स्थिती

अ. क्र.	आरोग्य विषयक सुविधा	एकूण	शेकडा प्रमाण
१	होय	५०	२५.
२	नाही	१५०	७५
	एकूण	२००	१००

क) कामगारांची उपचार विषयक स्थिती

अ. क्र.	उपचार कोठे घेता	एकूण	शेकडा प्रमाण
१	शासकीय दवाखान्यात	७१	३५.५
२	खाजगी दवाखान्यात	११५	५७.५
३	इतर	२००	७
	एकूण		१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

कंपनी कामगारांची आरोग्य विषयक स्थिती जाणून घेतली असता असे दिसून आले की, कंपनीत काम करणाऱ्या ३८.५ टक्के कामगारांना आरोग्य विषयक गंभिरत्रास होत असून, कंपनीत काम करणाऱ्या एकून कामगारांपैकी ४५.५ टक्के कामगारांना आजारी असल्यास सुटटी दिली जात नाही त्यामुळे आजार अंगावर काढत्यामुळे कामगार गंभीर आजाराचे शिकार होत आहेत. कंपनीमध्ये कामगारांसाठी आवश्यक सुविधामध्ये आरोग्य विषयक सुविधा महत्वाची आहे परंतु ७५ टक्के कामगारांना कंपनीमध्ये ही सुविधा दिली जात नसल्याचे दिसून आले. यावरून कामगारांच्या आरोग्याविषयी कंपनी मालक गंभीर नसल्याचे दिसून येते.

१२.विमाविषयक स्थिती :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची विमा विषयक स्थिती तक्ता क्र१० दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.१०: कामगांराची विमाविषयक स्थिती

अ. क्र.	कंपनीने विमा उतरवला काय	एकूण	शेकडा प्रमाण
१	होय	९	४.५
२	नाही	१९१	९५.५
	एकून	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

कंपनी मध्ये काम करतानां अपघात होयाची शक्यता अधिक असते. त्यामुळे कंपनी कामगारांचा विमा उतरवणे आवश्यक असते. वरील कारणावरून असे दिसून येते की, वाळूज एम.आय.डी.सी तील नमूना निवडलेल्या एकून २०० कामगारांपैकी केवळ ४.५ टक्के कामगारांचाच विमा उतरवलेला असून ९५.५ टक्के कामगारांचा विमा उतरवलेला नाही. यावरून कंपनी मालकाना कामगाराच्या जिवनाची व त्यांच्यावर येत

तक्ता क्र.११:कंत्राटदाराच्या मदतीने कामावर जाण्या विषयीची स्थिती

अ. क्र.	कंत्राटदाराच्या मदतीने कामावर जाता काय	एकूण	शेकडा प्रमाण
१	होय	८८	४४
२	नाही	११२	५६
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

कंपनीतील नमूना कामगारांपैकी ४४ टक्के कामगार आजही कंत्राटदाराच्या मदतीने कामावर जात असून कंत्राटदाराकडून शोषणाचे बळी ठरत आहेत. केवळ ५६ टक्के कामगार कंत्राटदाराच्या मदतीने कामावर जात नसल्याचे दिसून आले.

१३ कंपनीत काम करण्याचे प्रमुख कारण :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची कंपनीत काम करण्याचे प्रमुख कारण तक्ता ११ दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.१२:कंपनीत काम करण्याचे प्रमुख कारण

अ. क्र.	काम करण्याचे कारण	एकूण	शेकडा प्रमाण
१	कुटूंबाची उपजीविका भागवण्यासाठी	१८०	९०
२	मुलांच्या शिक्षणासाठी	०६	३
३	आरोग्य विषयक खर्च	०२	१
४	मुलीचे लग्न करण्यासाठी	००	०
५	इतर ठिकाणी रोजगार मिळत नाही म्हणून	०७	३.५
६	कर्ज फेडण्यासाठी	०४	२
७	इतार	०१	०.५
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

कंपनीत काम करण्याचे प्रमुख कारण

वाळूज एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीतील नमूना निवडलेल्या कामगारांपैकी ९० टक्के कामगार कुटुंबाची अपजिविका भागविण्यासाठी कंपनीत काम करत असून ३ टक्के मुलांच्या शिक्षणासाठी, १ टक्का आरोग्य विषयक खर्च भागविण्यासाठी, २ टक्के कर्ज फेडण्यासाठी, ०.५ टक्के अन्य कामासाठी व ३.५ टक्के कामगार इतर ठिकाणी काम मिळत नाही म्हणून कंपनीत काम करत असल्याचे दिसून आले.

१४.कामगार कुटुंबाचा एकूण मासिक खर्च :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची कंपनीत काम करीत असण्याची स्थिती तक्ता क्र. १३दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.१३:कुटुंबाचा एकूण मासिक खर्च (रू)

अ. क्र.	मासिक खर्च	एकूण	शेकडा प्रमाण
१	४०००	३२	१६
२	६०००	७४	३७
३	८०००	३८	१९
४	१०,०००	३३	१६.५
५	१२,०००	२३	११.
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

वाळूज एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीतील नमुना कामगारांपैकी १६ टक्के कामगारांचा मासिक खर्च ४ हजार रूपये, ३७ टक्के कामगारांचा मासिक खर्च ६ हजार रूपये, १९ टक्के कामगारांचा ८ हजार रूपये, १६.५ टक्के कामगारांचा १० हजार रूपये, ११ टक्के कामगारांचा १२ हजार रूपये मासिक खर्च असल्याचे दिसून येते.

१५.कामगारांचे मासिक वेतन :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांचे मासिक वेतन तक्ता क्र. १४दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.१४:कामगार कुटुंबाची मासिक वेतनाची स्थिती

अ. क्र.	वेतन	एकून	शेकडा प्रमाण
१	४०००	०६	३
२	६०००	३०	१५
३	८०००	७३	३६.५
४	१०,०००	४२	२१
५	१२,०००	४९	२४
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

संदर्भीय नमूना कामगारांपैकी ३६.५ टक्के कामगारांना ८ हजार रूपये २४ टक्के करमगारांना १२ हजार रूपये, २१ टक्के करमगारांना १० हजार रूपये, १५ टक्के कामगारांना ६ हजार रूपये, ३ टक्के करमगारांना मासिक वेतन मिळत असल्याचे दिसून आले हे वेतन वाढत्या माहगाईच्या काळात तुटपुंजे असल्याचे दिसून येते.

१६.कामगारांचे वेतनः

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची वेतन विषयक स्थिती तक्ता क्र.१५ दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.१५:अ) वेतन विषयक स्थिती

अ. क्र.	वेतन कसे मिळते	एकूण	शेकडा प्रमाण
१	रोखीने	८९	४४.५
२	धनादेश	०१	०.५
३	खात्यावर जमा	११०	५५
४	इतर	००	००
	एकूण	२००	१००

ब) वेतन मिळण्याची कालावधी

अ. क्र	वेतन कधी मिळते	एकूण	शेकडा प्रमाण
१	रोज	००	००
२	आठवड्याने	०४	२
३	महिन्याला	१९६	९८
४	वार्षिक	००	००
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

नमुना निवडलेल्या कंपनी कामगारांपैकी ५५ टक्के कामगारांचे वेतन खात्यावर जमा करण्यात येत असून ४४.५ टक्के कामगारांचे वेतन रोख स्वरूपात, ०.५ टक्के कामगारांचे वेतन धनादेशाद्वारे दिलेजात असल्याचे दिसून आले

एकूण नमुना कंपनी कामगारांपैकी ९८ टक्के कामगारांना वेतन हे महिन्याला मिळत असून २ टक्के कामगारांना वेतन हे आठवड्याने मिळत असल्याचे दिसून येते.

१७. प्राप्त वेतनावर समाधानाचीस्थिती :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची कंपनी कामगारांना मिळत असलेल्या वेतनावर समाधानी/असमाधानीअसल्याविषयी स्थिती तक्ता क्र.१६ दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.१६:प्राप्त वेतन व समाधान विषयक स्थिती

अ. क्र.	समाधानी	एकूण	शेकडा प्रमाण
१	होय	४३	२१.५
२	नाही	१५७	७८.५
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

कंपनी कामगारांना मिळत असलेल्या वेतनावर नमुना कामगारांपैकी केवळ २१.५ टक्के कामगार समाधानी आहेत. परंतु ७८.५ टक्के कामगार प्राप्त वेतनावर समाधानी नाहीत कारण कामगारांना करावे लागत असलेले काम अधिक परिश्रमाचे असून त्या तुलनेत वेतन अल्प असल्याचे दिसून येते.

१८.कामगार कुटुंबाच्या परिस्थितीत सुधारणा :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची कुटुंब विषयक सुधारणांचीस्थिती तक्ता क्र.१७ दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.१७:कुटुंबाची सुधारणा विषयक स्थिती

अ. क्र.	सुधारणा	एकूण	शेकडा प्रमाण
१	होय	४९	२४.५
२	नाही	१५१	७५.५
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

कोणती ही व्यक्ती काम करते ती आपल्या जीवनमानात सूधारणा करण्यासाठी एकून नमूना निवडलेल्या कामगारांपैकी केवळ २४.५ टक्के कामगारांच्या कौटुंबीक परिस्थितीत सूधारणा झालेली आहे. परंतु ७५.५ टक्के कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा होत नसल्याचे दिसून आले.

१९. कर्ज स्थिती :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची कर्ज विषयक स्थिती तक्ता क्र.१८दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.१८:कामगारांची कर्ज विषयक स्थिती

अ. क्र.	कर्ज	एकूण	शेकडा प्रमाण
१	होय	९१	४५.५
२	नाही	१०९	५४.५
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

कामगारांची कर्जविषयक स्थिती

वाळूज एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीतील कंपनी कामगारांपैकी नमुना निवडलेल्या एकूण कामगारांपैकी ५४.५ टक्के कामगार कर्जबाजारी नाहीत. परंतु ४५.५ टक्के कामगार कर्जबाजारी आहेत.कारण त्यांना मिळालेल्या वेतनातून त्यांना जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या गरजा पूर्ण होत नाहीत.

२०. योजनेचा लाभ :

वाळूज एम.आय.डी.सी औद्योगिक वसाहतीतील कामगारांची योजना विषयक स्थिती तक्ता क्र.१९ दर्शवण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.१९: योजनच्या लाभा विषयीची स्थिती

अ. क्र.	योजनेचा लाभ	एकूण	शेकडा प्रमाण
१	होय	२४	१२
२	नाही	१७६	८८
	एकूण	२००	१००

आधार : प्रत्यक्ष पाहणी.

औद्योगिक कामगारांच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य शासनाने अनेक योजना सूरू केलेल्या आहेत. परंतु नमूना निवडलेल्या एकूण कामगारांपैकी १२ टक्के कामगारांना योजनांचा लाभ झाला असून ८८ टक्के कामगारांना कोणत्याही योजनेचा लाभ झाला नाही. करण कामगारांना त्यासाठी असलेल्या योजनांची माहिती नसल्याचे दिसून आले

२०. वाळूज औद्योगिक वसाहतीतील कामगारांच्या समस्या:

एका बाजूला उत्पादनाचा महत्वपूर्ण घटक व दुसऱ्या बाजुला समाजाचा घटक अशा दुहेरी भूमिकेत असनाऱ्या कामगाराच्या शोषणाची तांत्रीक मांडणी कार्ल मर्क्स यांनी केली होती. कार्ल मार्क्स यांच्या विचारामुळे रशियात क्रांती घडून आली. परंतु साम्यवादी रशियाचे ही नंतर विघटन झाले. परंतु अलिकडील भांडवलशाहीच्या किंवा मुक्त अर्थव्यवस्थेच्या काळात ही कामगार वर्गाकाडे दुर्लक्ष करून चालनार नाही. भारतासारख्या विकसनशील देशात कामगार हिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे. कारण मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत टिकण्याची पूर्व तयारी आवश्यक असते. भारतीय समाज कल्याण आणि विशेषः कामगार वर्ग वेगळ्या परिस्थितीत जीवन जगत आहे. आजही विकसित राष्ट्रातील कामगारांना मिळणाऱ्या संरचनापेक्षा कमतरता आहे. समाज म्हणून समाजाची आणि शेवटी पर्यायाने शासनाची जबाबदारी वाढते. कारण आंतरराष्ट्रीय रचनेतील लाभ मिळवाचे असतील तर कामगार क्षेत्रात प्रचंड सुधारणा होणे आवश्यक आहे. कामगारांच्या सर्वांगीन विकासासाठी कटीबध्दनियोजणाची आवश्यक्ता आहे.

औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या अस्थायी कामगारांसमोर अनेक पश्न निर्माण होतात. व त्याचे दूरगामी परिणाम कामगारांवर होतात. वाळूज औद्योगिक कसाहतीत देखील अस्थायी कामगांराच्या बाबतीत अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसतात. या समस्यांमध्ये प्रामुख्याणे खालील समस्या तीव्र बनत आहेत.

१. रोजगारातील अस्थैर्य.
२. उत्पनात सातत्याचा अभाव.
३. आर्थिक समस्येत वाढ.
४. कौटुंबीक कलहात वाढ.
५. पाल्यांच्या शिक्षण विषयक आडचणीत वाढ.
६. आरोग्य विषयक समस्या.
७. शिक्षण आणि प्रशिक्षणाचा अभाव.
८. कौशल्य व तांत्रिक ज्ञानाचा अभाव.
९. विम्याचे संरक्षण नसणे.
१०. कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण नसणे.
११. संयुक्त कुटुंब पध्दतीत अडथळे.
१२. योग्य मजुरी/वेतणाचा अभाव.
१३. योग्य विकासाच्या समस्या.
१४. जोडधंद्याचा अभाव.
१५. अनारोग्याच्या समस्येत वाढ.
१६. कल्याणकारी योज**ना**चा अभाव.

२१.शिफारशी

संशोधनांती वाळूज औद्योगिक वसाहतीतील अस्थायी कामगारांच्या विकासासाठी खालील उपाययोजना होणे आवश्यक आहे.

१. अस्थयी कामगारांना कामाची हामी द्यावी.
२. कामगारांना शिक्षण-प्रशिक्षण देऊन त्यांच्या कौशल्यात वाढ करावी.
३. कामगारांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळावा.
४. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेला अपेक्षीत असलेल्या सोई कामगारांना मिळाव्यात.
५. कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीत निर्धारीत वेळेत कंपनी मालकानी वित्तीय मोबदला जमा कारावा.
६. निवासापासून कंपनी पर्यंत येण्या-जाण्याकरीता कंपनीने वाहणाची सोय उपलब्ध करून द्यावी.
७. कामगारांना योग्य बोनस दिला जावा.
८. कामगारांच्या पाल्याच्या शिक्षणासाठी आर्थिक प्रोत्सानपर योजना चालू कारावी.
९. कामगारांच्या निवासासाठी कायमस्वरूपी सदनीका उपलब्ध करून द्याव्यात.
१०. कामगारांचा व त्यांच्या कुटुंबाचा विमा उतारावा.
११. महिला कामगारांच्या सुरक्षिततेची योग्य दखल घ्यावी.
१२. औद्योगिक मंदी काळात कामगारांच्या बेकारीमुळे उपासमारीची वेळ येउ नये म्हणून एकत्र, स्वतंत्र बेकारी भत्ता निधीची तरतुद करावी. यामध्ये मालक व कामगार दोघांनीही आर्थिक योगदान द्यावे.
१३. औद्योगिक क्षेत्रातील अस्थयी कामगारांना रास्त किंमतीत धान्य उपलब्ध होण्यासठी सहकारी तत्वावर ग्राहक भाडांराची निर्मीती करावी.
१४. ग्रामीण भागातील कामगार ग्रामीण भागातच राहणे आवश्यक असल्याने ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधीत वाढ करावी.
१५. ग्रामीण भागातील कृषी आधारीत उद्योगांच्या निर्मितीला चालना द्यावी त्यामुळे ग्रामीण भागातही रोजगार उपलब्ध होईल.
१६. कामगार कायद्याची निर्मिती,त्याची जागृती आणि आमंलबजावणी योग्य प्रकारे व्हावी.
१७. कामगार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या औद्योगिक कंनन्यावर/कारखान्यांवर कडक कारवाई करून कामगारांचे हिताचे रक्षण करावे.

संदर्भसूची :

१. Economic survey of Maharashtra Government 2004- 2015 to 2014-15
2. Kumar H.L and Gaurav Kumar (2007), “Labour Laws” Universal Law Publishing go. PVT. Delhi.
3. Pillai K. M. (2003), “Labour and Industrial Law” Allahanad Law Agenct Law Publisher Faridabad.
4. Taxman (2004), “Lsbout laws” Taxman Allied Service PVT.Ltd; New Delhi.
५. कारखाने कि.रा. (१९८०), ''औद्योगिक जडण-घडन'', कॉन्टीनेंटल प्रकाशन मंडळ पुणे.
६. दत्त एवं सुन्दरम (२०१४), ''भारतीय अर्थव्यवस्था'' एस चन्द एण्ड कम्पनी प्रा. लि. नई दिल्ली.
७. दास्ताने संतोष व विनय हर्डीकर (१९८५), ''महाराष्ट्र १९८५'' दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे.

८. पाटील जे. एफ. (२०१०), ''महाराष्ट्राची बदतली अर्थव्यवस्था'', सकाळ प्रकाशन पुणे.
९. पांडे दिनकर (१९८६), औद्योगिक अर्थशास्त्र, शारदा प्रकाशन, नांदेड.
१०. महाराष्ट्र शासन (२०१४), ''जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन औरंगाबाद जिल्हा -२०१४''. जिल्हा सांख्यिकीय कार्यालय अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन, औरंगाबाद.
११. महाराष्ट्र शासन (२०१६), महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई.
१२. महाराष्ट्र शासन (२०१२), ''महाराष्ट्र मानव विकास अहवाल-२०१२'', नियोजन विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई.
१३. मिश्रा एस.के. एवं वि.के पुरी (२००९), भारतीय अर्थव्यस्था, हिमालया पब्लिशिंग हाऊस, दिल्ली.
१४. सोळुंके आर.एस. आणि व्हि.बी ककडे (२००३), भारतीय अर्थव्यवस्था, इंडिया प्रिटिंग हाऊस मुंबई.
15. www. Aurangabad basiness.co